# प्रकरण - ४

## प्रकरण चौथे

# सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे सहकार व औद्योगिक क्षेत्रातील कार्य

### प्रस्तावना

सहकारी चळवळीच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य हे एक भारतातील प्रगत व यशस्वी राज्य मानले जाते. महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रात विविध संस्था सहकारी तत्त्वावर कार्यरत असलेल्या दिसतात. त्यात प्रामुख्याने साखर उद्योग, सूतगिरण्या, पतसंस्था, सहकारी बँका, दुग्ध व्यावसायिक सहकारी संस्था, कुक्कुटपालन संस्था इत्यादींचा समावेश होतो. या क्षेत्रातील सहकारी संस्थांनी महाराष्ट्राच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान मिळविले आहे. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्राने विकास कार्यात मक्तेदारी प्रस्थापित केली आहे.

भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर, लोणी (अहमदनगर) येथे १९४९ मध्ये सुरु झाला. नंतर अनेक क्षेत्रात सहकारी तत्त्वाची घौडदौड सुरु झाली. लोकांच्या भागभांडवलावर विविध संस्था निर्माण केल्या आहेत. सहकार चळवळीमध्ये 'सहकार' या संकल्पनेचा ढोबळमानाने असा अर्थ घेतला जातो की, 'समान हितसंबंध, समान संधी आणि सहकार्य या तत्त्वांचा आधार घेऊन एकत्र आलेल्या लोकांचे ऐच्छिक मंडळ म्हणजे सहकारी संस्था होय.' सहकारी चळवळीमध्ये प्रत्येक सदस्य समान मानला जातो. 'एक सर्वांसाठी आणि सर्व एकासाठी' हे तत्त्व सहकारी चळवळीत आढळते.

सहकाराविषयी शासनाचे धोरण सर्वत्र सारखेच होते. पण सहकारी चळवळ महाराष्ट्रातच भक्कम झाली. त्याचे कारण म्हणजे सहकार चळवळीला लाभलेले खंबीर व गतीमान नेतृत्त्व होय. ही चळवळ महाराष्ट्रात यशस्वी करण्यास नामदार गोखले, वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, श्री. विठ्ठलराव विखे-पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, सर्वश्री यशवंतराव चव्हाण, वसंतरावदादा पाटील, यशवंतराव मोहिते, शंकरराव मोहिते-पाटील, बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, तात्यासाहेब मोहिते, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, शरद पवार, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, बाळासाहेब

विखे-पाटील, इत्यादी मातब्बर आणि कार्यक्षम व्यक्तींच्या नेतृत्त्वाने आणि मार्गदर्शनामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ यशस्वी झाली. देश स्वतंत्र झाल्यानंतर विकासाच्या आराखड्यामध्ये सहकाराला विशेष महत्त्व देण्यात आले. त्यामध्ये अर्थकारणाबरोबर राजकारणही होते.

ग्रामीण भागात उत्पादनाशी निगडीत उपलब्ध असलेली साधनसामग्री, जमीन, पाणी, मनुष्यबळ, पशुधन व जमिनीवरील टाकावू पदार्थ इत्यादी आहे. या साधनसंपत्तीचा विकास घडवून आणल्याशिवाय ग्रामीण उत्पादनवाढीला चालना मिळणार नाही. या उत्पादीत झालेल्या मालावर आवश्यक ती प्रक्रिया करुन योग्य बाजारपेठ मिळवून दिल्याशिवाय या उत्पादनाचे रुपांतर पैशाच्या स्वरूपात करता येणार नाही आणि पैशाच्या स्वरूपात ग्रामीण जनतेचे उत्पन्न वाढविल्याशिवाय त्यांची खरेदीक्षम्ता सुधारणार नाही. या पायाभूत विचारसरणीमधूनच विकासाचे विविध उपक्रम सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी राबविले. त्यातूनच या अकलूज परिसरात विविध सहकारी संस्थांची निर्मिती झाली. या सर्व संस्था आज यशस्वी वाटचाल करीत आहेत. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे सहकार व औद्योगिक क्षेत्रातील कार्य विविध सहकारी संस्थांच्या माहितीद्वारे आपणास दिसून येईल.

**विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, अकलूज**

या संस्थेची स्थापना २१-११-१९४६ ला झाली असली तरी २० ऑगस्ट १९४४ ला या संस्थेचे स्फूर्तिदाते सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील संस्थेचे सभासदझाले. संस्था हे आपले कार्यक्षेत्र समजून त्यांनी संस्थेच्या विकासाच्या विविध योजना राबविण्यास सुरुवात केली. प्रथम त्यांनी १९४६ मध्ये संस्थेमध्ये अडत दुकान सुरु केले.

१३ ऑक्टोबर १९४६ ला मा. श्री. वैकुंठभाई मेहता यांचे अध्यक्षतेखाली या संस्थेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी शंकररावजींनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेवून संस्थेच्या भावी प्रकल्पाची माहिती दिली. त्यापासून संस्थेच्या कामास जोर आला. अनेक विकास योजना शीघ्रगतीने अंमलात येऊ लागल्या. १९५० साली संस्थेने ट्रॅक्टर खरेदी करुन सभासदांच्या जमिनीची अल्पदराने नांगरट करुन देण्यास सुरुवात केली.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तसेच पिकांची पहाणी करुन कर्जमर्यादा दर एकरी ६०० रुपयांवरुन १००० रुपयांपर्यंत वाढविली. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी, शेतमालास योग्य भाव मिळावा, शेतकऱ्याला उर्जितावस्था यावी यासाठी १९५९ साली शंकररावजींनी या परिसरात साखर कारखाना काढावा म्हणून जोराचे प्रयत्न सुरु केले. कारखान्याचे शेअर्स घेण्यासाठी शेतकऱ्यांना या संस्थेमार्फत कर्जवाटप केले व १९६० साली यशवंत सहकारी साखर कारखाना मूर्त स्वरूपात आला. त्यामुळे संस्थेला कर्जवाटपाच्या वसुलीची खात्री झाली. खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची उन्नती होऊ लागली. १९६० सालापासून संस्थेने गुप्त मतदान पद्धतीचा अवलंब करुन वाटचाल सुरु केली. १९६८ साली संस्थेमार्फत स्वस्त कापड दुकान सुरु केले. शंकररावजींच्या प्रेरणेतूनच १९६९ साली संस्थेच्या स्वतःच्या मालकीच्या जागेत गोडावूनचे बांधकाम पूर्ण करुन स्वतंत्ररित्या खत विभाग सुरु केला. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांना माफक दरात रासायनिक खतांचा पुरवठा होऊ लागला. संस्थेने १९७४-७५ मध्ये शासनाच्या पायलट स्कीममध्ये ऊस व गहू या पिकांसाठी कर्जवाटप केले. तसेच दुग्ध व्यवसायाला गती मिळावी म्हणून गाई खरेदीसाठी संस्थेने रुपये ६ लाख मध्यम मुदतीचे कर्जवाटप केले. तसेच शासनाच्या २० कलमी योजनेत सहभागी होऊन अल्पभूधारक, शेतमजूर, दुर्बल घटकांना शेळ्या-मेंढ्या खरेदीसाठी कर्जवाटप केले. यामुळेच ही संस्था अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते.

**सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., अकलूज**

"अकलूजमध्ये अगदी उजाड माळरान होते. प्रारंभी कशीबशी तग धरलेली शेती, तिच्यात पिकणारे अपुरे धान्य, मोठ्या प्रमाणात अशिक्षित वस्ती, डोंगराएवढे दारिद्र्य, भविष्यकाळ नव्हताच. मातीतून आणि मनामधून नदी नव्या कर्तबगारीचे धुमारे फुलवील अशी आशाही कोणाला नव्हती. नीरा नदीचे खळखळते पाणी मुकाट वहात होते. तेव्हा पाणी अडवावं व वळवावं आणि भिजल्या भूमीतून भरघोस पीक डोलवावं इतकाही विचार कोणी केला नव्हता. अर्थात या विचारामागे जे ध्येयवादाचे, निश्चयाचे आणि जीवावर उदार होऊन कष्ट करण्यास एखाद्या झुंजार व्यक्तिमत्त्वाचं बळ असावं लागते ते बळ असणारा एकमेव माणूस या माळरनावर उभा राहिला, तो म्हणजे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील. समाजाच्या स्थितीगतीचा अचूक वेध त्यांनी घेतला.

कार्याची दिशा निश्चित केली आणि कष्टाची तयारी असणारा कार्यकर्त्यांचा संचही तयार केला."[१] विविध सहकारी उद्योगांची पायाभरणी, पाणीपुरवठ्याच्या विस्तृत योजना, कुक्कुटपालनासारखे कुटीरउद्योग, दूधाचा महापूर आणि सांस्कृतिक विकासाचे उत्तम आराखडे शंकररावांच्या कल्पक, कष्टाळू व्यक्तिमत्त्वाने इथले जनजीवन बदलून टाकले.

अत्यंत कमी पावसाचा आणि दुष्काळी जिल्हा म्हणूनच ओळखला जाणाऱ्या सोलापूर जिल्हयातील माळशिरस तालुका त्या गुणांना अपवाद नव्हता. त्यांच्या नावातच त्यांचे वैशिष्ट दडलेले. या तालुक्यात जमीन कधीच पिकत नव्हती. खडकाळ परिसरामुळे पर्यावरणाच्या तोट्यांचाच लाभ या भागाला झाला. तो म्हणजे सतत अधिकाधिक दारिद्र्य, अज्ञानी आणि बेकारीने समाज होरपळून निघत होता. अकलूजचे सरपंच असताना त्यांनी राष्ट्रीय सेवादलाचे काम करुन आणि १९४२ च्या चळवळीत अविश्रांत कार्य करुन या भागात अज्ञानाच्या अंधराचा शेवट करण्यासाठी ज्ञानाची ज्योत पेटवली आणि आजही त्या ज्योतीचा प्रकाश विविध लोकांच्या चेहऱ्यावर तेवताना दिसत आहे.

संघर्षाशिवाय उत्कर्ष नाही असे सहकारमहर्षि नेहमी म्हणत प्रतिकूल परिस्थितीशी १९४९ पासून सतत झगडा देऊन शेतकरी, कामगार व सर्वसामान्य जनतेची आर्थिक उन्नती साधणाऱ्या भांडवलशाहीच्या कुटील कारखान्यांना मूठमाती देऊन आणि शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करुन सहकारी तत्त्वावर साखर कारखाना निर्मितीची वाटचाल त्यांनी जोमाने सुरु केली. ज्या ठिकाणी आज या कारखान्याची उभारणी करण्यात आली आहे तो भाग त्यावेळी अत्यंत ओसाड होता. दिवसासुद्धा या जागेत माणसे येण्यास घाबरत असत. त्याकाळी साखर कारखान्याची स्थापना करण्याची कल्पना जनतेसमोर मांडणे म्हणजे स्वत:ची हेटाळणी करुन घेण्यासारखेच होते. ही कल्पनाच काही लोकांच्यादृष्टीने हास्यास्पद होती. पण अशा प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन त्यातून शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या योजना मूर्त स्वरूपात आणण्याचे सामर्थ्य सहकारमहर्षिमध्ये होते. त्यांनी भरपूर प्रयत्न करुन कारखान्याची स्थापना अत्यंत निस्वार्थी बुद्धीने रात्रंदिवस झटून केली.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सहकारमहर्षि पट्टीचे वक्ते होते. त्यांचे व्याख्यान म्हणजे उपना रुपकांची मेजवानी असे. तसेच ग्रामीण भागातील जनतेला मोहून टाकणारी विलक्षण शक्ती त्यामध्ये असे. ते नेहमी म्हणत, "शेतात पाणी तर शेतकऱ्यात पाणी". तसेच "जीवंत जीवमान असेपर्यंत जनसेवा करीन" जीविताचे हेच एक ध्येय मानून त्यांनी आपल्या कार्याचा श्रीगणेशा केला. पुरेसे भांडवल जमविल्याशिवाय कारखाना रजिस्टर होणे, मशिनरीची ऑर्डर देणे, राज्य सरकारचे भागभांडवल मिळविणे वगैरे कामे करणे शक्य होणार नाही याची पूर्ण जाणीव त्यांना होती. कारखान्यासाठी भागभांडवल जमा करण्यामध्ये आलेल्या अनंत अडचणींवर आत्मविश्वासाने मात करुन या भागातील शेतकऱ्यांनी त्यांना जे सहकार्य दिले ते अलौकिक आहे. इंदापूर व माळशिरस तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी तर अक्षरशः आपली जनावरे विकली. घरातील दागदागिने व बियाणांसाठी ठेवलेले अन्नधान्य विकले आणि शेअर्सची रक्कम भरुन कारखान्याच्या निर्मितीस भागभांडवलाच्या स्वरूपात हातभार लावला. 'यशवंत' सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे माळशिरस व इंदापूर तालुक्यातील भागामध्ये सहकारी चळवळीचे नवे पर्व सुरु झाले. "एका दिव्याने दुसरा दिवा प्रज्वलित करावा या व्यापाने नवीन संस्था सहकारी तत्त्वावर उदयास येऊ लागल्या आणि नक्षत्र मंडळात सूर्याभोवती सर्व ग्रहांनी ताऱ्यांनी फिरत मार्गभ्रमण करावे तशा पद्धतीने साखर कारखान्याच्या भोवती या संस्था विकसित होत गेल्या. आज त्याची स्वतंत्र संचालक मंडळे आहेत. पण तरीही मार्गदर्शक संस्था म्हणून ही संचालक मंडळे 'साखर कारखान्याकडेच' पाहतात.[२]

कारखान्याचे शेअर भांडवल जमा करण्याची पहिली सभा २० मे १९५५ रोजी व दुसरी सभा २५ ऑक्टोबर १९५९ रोजी होऊन पुढील कार्याची वाटचाल सुरु झाली. त्याचे प्रतीक म्हणजे महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या शुभहस्ते नियोजित कारखाना कार्यालयाचा उद्घाटन समारंभ १९ नोव्हेंबर १९५९ रोजी साजरा झाला. लगेचच साखर कारखान्याची नोंदणी सहकारी कायदयाखाली २० जून १९६० रोजी करण्यात येऊन केंद्र सरकारकडून औद्योगिक परवाना ९ डिसेंबर १९६० रोजी मिळाला व या संस्थेच्या कार्यास जोमाने गती मिळाली. सहकारमहर्षिनी आपल्या समकालीन तरुण कार्यकर्त्यांचा संच जमविला आणि त्यांच्या मदतीने

व कारखान्याच्या माध्यमातून दरवर्षी एक दोन नव्या योजनांचा प्रारंभ केला. स्थूलमानाने सांगावयाचे झाले तर १९६४ मध्ये ट्रक व ट्रॅक्टर्स ऊस वाहतूक योजना सुरु झाल्या. त्याचवर्षी कामगारांना अर्थसहाय्य करण्यासाठी सहकारी तत्त्वावरील पतपेढी चालू केली. राजहंस सहकारी कुक्कुटपालन संघाची स्थापना झाली. टेक्निकल हायस्कूलची स्थापना हे दोन नवे उपक्रम १९६५ मध्ये सुरु केले. कुक्कुटपालनामुळे रोजगार वाढला. तसेच उत्पन्नही वाढले. त्यात कारखान्यातील कामगारच अधिक संख्येने सभासद होते. आपल्या मालाला आपण बाजारपेठ निर्माण करण्याची कल्पना पुढे आली. त्यातून हा प्रकल्प स्वावलंबी झाला आहे. आज अकलूजची अंडी पुण्या-मुंबईपर्यंत विकली जातात. १९६७ मध्ये बेरडवाडीची लिफ्ट इरिगेशन योजना सहकारी तत्त्वावर चालू झाली. १९६८ मध्ये विजय प्रिंटींग प्रेस चालू करुन कामगारांच्या घरातील महिलांना रोजगार देण्यात आला.

**श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर**

"माळशिरस तालुक्याच्या पूर्व भागात अकलूज, माळीनगर व श्रीपूर याठिकाणी साखर कारखाने असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचा विकास झाला. माळशिरस तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी त्या भागात एक सहकारी साखर कारखाना काढावा अशी त्या भागातील शेतकऱ्यांची एकमुखी मागणी होती आणि सहकारी तत्त्वावर साखर कारखाना स्थापन करण्यास अनुकूल परिस्थितीही होती. खाजगी मालकीच्या चितळेनगर येथे कित्येक वर्षे अपूर्णावस्थेत कारखाना होता. पण त्यादृष्टीने केलेले प्रयत्न निष्कळ झालेले होते. या चितळे शुगर वर्कस या कारखान्याची उभारणी सुमारे १० वर्षाचा कालावधी होऊनही तेथे साखरेचे उत्पादन होऊ शकले नव्हते. कारखाना सुर करण्यासाठी काहीच प्रयत्न न झाल्याने १९६७ मध्ये ही कंपनी लिक्वीडेशनमध्ये निघाली. शेतकऱ्यांची सर्वांगिण आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व सर्वसाधारण जनतेचा भविष्यकाळ उज्वल करण्यासाठी सतत कार्यमग्न असलेले सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी माळशिरस तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकऱ्यांची 'श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर' ही संस्था स्थापन केली.[3] या संस्थेची सहकारी कायदयाखाली २२ एप्रिल १९६८ रोजी नोंदणी

करण्यात आली. त्यानंतर लिक्वीडेशनमध्ये निघालेला चितळे शुगर वर्क्स हा कारखाना केवळ ३७.५० लाख रुपये देवून खरेदी केला.

"कारखान्याचा प्रत्यक्ष ताबा १ डिसेंबर १९६८ रोजी मिळाला. वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे कित्येक वर्षे अपूर्णावस्थेत असलेल्या कारखान्याची उभारणी अत्यंत द्रुतगतीने करण्यात येऊन १४ एप्रिल १९७० रोजी प्रत्यक्ष साखर उत्पादनास सुरुवात झाली."[४] सहकारमहर्षिंच्या दूरदर्शी व व्यवहारी मार्गदर्शनाखाली कार्यान्वित झालेल्या या कारखान्याची प्रगती प्रशंसनीय असून अनुकरणीय आहे.

**राजहंस सहकारी कुक्कुटपालन संघ**

"सर्वसामान्य जनतेला सहकारी चळवळीचा फायदा मिळवून देण्यासाठी सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी १९६४ मध्ये सहकारी तत्त्वावर हा कुक्कुटपालन संघ स्थापन करुन ग्रामपंचायती, विवध कार्यकारी सोसायटी व साखर कारखाना आणि अन्य संस्थांच्या सेवकांना व कामगारांना या संघाचे सभासद करुन घेतले."[५] हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून नंतरच्या काळात अनेक संस्था निर्माण झाल्या.

कुक्कुटपालन संघाने प्रारंभी सात हजार पिल्ले आणून ती वाढविली. आज या संस्थेत लाख दीड लाखाहून पक्षी असून सभासदांना प्राथमिक तत्त्वावर घरी ते पक्षी पाळण्यासाठी दिले जातात. हा व्यवसाय शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास फायदेशीर ठरतो हेच त्यातून दिसून आले आहे. या सभासदांना त्यांच्या अंड्याची विक्री करुन दिली जाते. तेव्हा बाजारपेठेची खात्री झाल्याने आता युनिटधारकांची संख्याही वाढू लागली आहे. तालुक्यात ५५ युनिटधारकांना दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. ॲण्ड लँड डेव्हलपमेंट बँकेतर्फे आतापर्यंत सुमारे ११ लाख रुपयांचा कर्जपुरवठा केला आहे. त्यातून युनिटधारकांनी पक्षी घेतले आहेत. पक्षी वाढविण्यासाठी व त्यांची संख्या वाढविण्यासाठी संस्थेची बार्डीग व्यवस्था असून पिंजरा पद्धतीने पक्षी वाढविण्याची योजना तेथे यशस्वीपणे राबविली जात आहे. या संस्थेतर्फे सध्या रोज सुमारे ६० हजार अंडी बाजारात विक्रीसाठी जातात. तर युनिटच्या माध्यमातून २० ते २२ हजार अंडी गोळा होतात. सभासदांच्या

१०० रुपयांच्या शेअरला संस्थेने आतापर्यंत सुमारे ६७० उत्पादक हिस्सा दिला आहे. डिव्हीडंड देणारी ही राज्यातील पहिलीच संस्था असेल.

"नाशवंत समजली जाणारी अंडी ताबडतोब विकली गेली नाहीत तर हा धंदा तोट्याचाच ठरु शकतो. त्यासाठी अंड्याला निश्चित बाजारपेठ हवी हे ओळखून संस्थेने अकलूज, पंढरपूर, सोलापूर आणि बार्शी येथे स्वतःची अंडी विक्री केंद्रे सुरु केली आहेत. तेथे रोज अंडी पाठविली जातात. अकलूजमध्ये ४,५००, पंढरपूर ३,५००, सोलापूर ८,००० आणि बार्शी ६,००० याप्रमाणे रोज विक्री होते."[५] याचाच अर्थ २० ते २२ हजार अंडी या केंद्रामार्फत विकली जातात. उरलेली अंडी मुंबई-पुण्याच्या बाजारपेठेत पाठविली जातात.

**शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ**

दुग्ध व्यवसायाचा विकास संकरीत गो-पैदास वाढविणे, त्यांच्या औषधाचा पुरवठा करणे, दुधाळ जनावरांची सभासदांसाठी खरेदी करणे आदी हेतू डोळ्यासमोर ठेवून आणि शेतकरी व कामगारांना जोडधंदा देण्यासाठी शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघाची स्थापना सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी केली आणि दुग्धोत्पादन व्यवसायाबाबत या भागात आवड निर्माण केली. ११ सप्टेंबर १९७६ ला दूध संकलनास प्रारंभ झाला. तेव्हा रोज सुमारे ५ हजार लिटर दूध संकलित होत होते. आज ते प्रमाण ८० ते ९० हजार लिटरवर गेले आहे. इतकेच नव्हे तर सुरुवातीला केवळ ५ सभासदांनी सुरु केलेल्या या संस्थेत आज १२६ सभासद आहेत. दूध संकलनासाठी संस्थेकडे स्वतःचे १७ ट्रक आहेत.

दुग्धोत्पादनाला जोडूनच संकरीत गो-पैदास, पशु आरोग्य सेवा, बेकरी उद्योग व दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती, डेअरी योजना अशा योजना राबविल्या जात आहेत. संकरीत गो-पैदास कार्यक्रम उरळीकांचन येथील भारतीय कृषि उद्योग प्रतिष्ठानचे माणिकभाई देसाई यांच्या सहकार्याने राबविण्यात आला. त्यासाठी जर्सी गायी खरेदी करुन त्या सभासदांना देण्यात आल्या. या उपक्रमासाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी अडीच कोटी रुपयाहून अधिक सहाय्य केले आहे.

संघाचा स्वत:चा आईसप्लँट होता. पण तो आता बंद करुन त्याचे रुपांतर आता चिलींग प्लँटमध्ये नुकतेच करण्यात आले आहे. संस्थेची दोन लाख लिटर क्षमतेची डेअरी उभारण्याची योजना परिपूर्णतेच्या मार्गावर आहे. विझोरीजवळ ५० एकर जमीन त्यासाठी खरेदी करण्यात आली आहे.

**सेवकांची पतसंस्था**

"कामगारांना त्यांच्या कौटुंबिक अडचणीच्या काळात मदत मिळावी किंवा त्यांना घरगुती उपयोगी वस्तूंची खरेदी करता यावी आणि किराणा सामान, शैक्षणिक साहित्य आदी वस्तू सवलतीच्या दरात मिळाव्यात यासाठी कामगारांनी पतसंस्था स्थापन केली आहे. 'सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना सेवकांची पतसंस्था' असे तिचे नाव असून संस्थेचे आज सुमारे ९६० सदस्य आहेत. या संस्थेची वार्षिक उलाढाल ५२ लाख रुपयांच्या जवळपास आहे."[६] कामगारांमध्ये आत्मियता निर्माण होण्यास या संस्थेचा मोठा हातभार लागत आहे.

**जवाहर को-ऑपरेटिव्ह इंजिनिअरिंग मेकॅनिक्स वर्कशॉप लि.**

कारखान्यातील फिटर्स, टर्नर्स, मोल्डर्स वगैरे कामगारांची सहकार तत्त्वावर एक संस्था सुरु केली. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना लागणारी शेती अवजारे, पंप, गोबरगॅस, इलेक्ट्रिक मोटर्स इत्यादी मशिनरीच्या किफायतशीर दुरुस्तीची व निर्मितीची कामे या संस्थेमार्फत किफायतशीर दराने करुन देण्यात येतात. ही संस्था ५३ कामगारांनी एकत्र येवून निर्माण केली असल्याने सहकारी क्षेत्रात एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था म्हणून तिचा उल्लेख केला जातो. या संस्थेची निर्मिती सहकारमहर्षि यांच्या प्रेरणेतून व कल्पनेतून झाली असून या संस्थेच्या कामाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे.

"गोबरगॅस, टँकर्स तसेच ऊस वाहतुकीसाठी रबरी टायर बैलगाड्या, पोल्ट्रीसाठी पिंजरे, निरनिराळे ग्रील्स वगैरे कामे या संस्थेमध्ये हाती घेण्यात येतात. आजमितीस संस्थेच्या सभासदांची संख्या १०१ असून सभासदांचे भागभांडवल अडीच लाख रुपयांच्यापुढे आहे."[७] या संस्थेची वार्षिक उलाढाल लवकरच एक कोटी रुपयांच्या घरात जाईल असा सभासदांना विश्वास वाटतो.

### शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट

केवळ साखर उत्पादन किंवा अन्य उद्योग सहकारी माध्यमातून करताना कामगारांच्या आणि सभासदांच्या सांस्कृतिक विकासाची काळजी करावयास हवी याची जाणीव या भागातील तीन सहकारी साखर कारखान्यांना होती आणि आजही आहे. या भावनेतून या कारखान्यांनी काही रक्कम देणगीरुपाने उत्स्फूर्तपणे दिली आणि या रक्कमेतून श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टची स्थापना करण्यात आली. या ट्रस्टने सामाजिक गरजा लक्षात घेता अनेक विविध प्रकारचे उपक्रम अत्यंत यशस्वीपणे राबवून एक आदर्श निर्माण केला आहे. या ट्रस्टच्या माध्यमातून १९७२ च्या दुष्काळात सोलापूर जिल्हयातील ११ तालुके आणि पुणे जिल्हयातील इंदापूर तालुका अशा बारा तालुक्यासाठी १२ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला. विशेष म्हणजे हे टॅकर्स भाड्याने न घेता विकत घेण्यात आले."[८] आणि त्याची गरज संपताच त्यावरील मेंटनन्सचा खर्च वाढवित न बसता ते विकून टाकण्यात आले. या विक्रीतून ट्रस्टला फार फायदा झाला.

### गौरीशंकर महिला उद्योग सहकारी संस्था

"ग्रामीण शेतकरी सुखी व्हायचा असेल तर त्याच्या कुटुंबाचाही हातभार त्याच्या कामात लागला पाहिजे ही एक वस्तुस्थिती आहे. ग्रामीण महिला स्वावलंबी व्हाव्यात, सहकाराचा फायदा त्यांना कळावा, स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद त्यांच्यात यावी आणि ते करताना अंगच्या सुप्त कलागुणांचाही विकास व्हावा, त्यांना तांत्रिक व्यवसायाची माहिती दयावी या व्यापक हेतूने सहकारमहर्षिनी २८ जानेवारी १९७६ रोजी "गौरीशंकर महिला उद्योग" या संस्थेची स्थापना केली. सुरुवातीला संस्थेचे २२८ सभासद झाले आणि ३३ हजार ३८० रुपयांचे भागभाडवल जमा झाले. आज भागभांडवल १ लाख २२ हजार ८८० रुपये आहे. साहजिकच संस्थेची वार्षिक ३ लाखांची उलाढाल आज २५ लाखांच्या जवळपास गेली आहे.

सुरुवातीच्या काळात पापड, तिखट, लोणची असे घरगुती पदार्थ तयार करण्यात आले आणि या पदार्थांना बाजारपेठ मिळावी या हेतूने भर बाजारपेठेत 'ग्राहक भांडार' सुरु करण्यात आले. त्यास चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे लक्षात येताच त्यांच्या जोडीला

प्रिंटींग, बायडींग, शिवणकाम, टायपिंग, कुक्कुटपालन आदी व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची सोय संस्थेतर्फे करण्यात आली. कारखान्यातील प्रिंटींग प्रेस महिला चालवित असून सध्या तेथे २५ महिला काम करीत आहेत.

### गिरीजा सहकारी दूध उत्पादक संस्था

"संकरीत गायी सभासदांना, कामगारांना मिळवून दिल्या पण त्यांच्या दूधाचे काय करायचे? असा प्रश्न कोणालाही पडेल पण तो सहकारमहर्षिनी गिरीजा सहकारी दूध उत्पादक संस्था स्थापन करुन सोडविला."[१०] कामगारांना जोडधंदा म्हणून वरदान ठरलेल्या या योजनेतून रोज सुमारे तीन हजार लिटर दूध जमा होते. ते शासकीय दूध योजनेस पुरवण्यात येते. पहिल्या वर्षी संस्थेचे सभासद ६१ होते. ती संख्या आता १४९६ झाली आहे. संस्थेचे भाग भांडवल १ लाख ७८ हजार रुपये असून खेळते भांडवल ७३ हजार २५५ रुपये आहे.

त्याचप्रमाणे दूध व्यवसाय विकास भाग महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत महाराष्ट्रातील दूध संघाची व्यवस्थापनाबाबत स्पर्धा प्रतिवर्षी घेतली जाते. त्यामध्ये १९८४-८५ साली संस्थेने पुणे विभागामध्ये प्रथम क्रमांक व महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळविला आहे.

### शंकरराव मोहिते-पाटील सहकारी सूतगिरणी

"शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास साधावा. तसेच कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या उत्पादित मालास योग्य मोबदला मिळावा या उद्देशाने या संस्थेची सहकारी कायदयाखाली दि. १८-१-१९८० रोजी नोंदणी करण्यात आली आहे. या योजनेचा संपूर्ण खर्च सुमारे ७ कोटी रुपये असून गिरणीच्या पात्यांची क्षमता २५,२०० आहे."[११]

केंद्र सरकारकडून या सूतगिरणीस औद्योगिक परवाना मंजूर केल्याचे इरादा पत्र मिळालेले आहे. निर्माण होणाऱ्या सूताची निर्यात करण्यात येणार आहे. सुरुवातीस १००० रोटर्स ५०४० स्पिंडलची ओपनएंड मशिनरी बसविण्याच्या कामास सुरुवात झालेली आहे.

**डिस्टीलरी**

"साखर कारखान्याची 'डिस्टीलरी' हा एक कारखान्याचा महत्त्वाचा घटक समजला जातो. या कारखान्याची स्वतःची ३० हजार लिटर्स क्षमतेची डिस्टीलरी असून तेथे अल्कोहोलपासून ॲसिटिक ॲसिडची निर्मिती करण्यास शासनाची मान्यता आहे. तसेच या डिस्टीलरीमध्ये उत्पादन सुमारे ५० लाख लिटर अल्कोहोल वापरण्यासाठी मान्यता मिळाली आहे. या खात्यापासून कारखान्याला दि. ३०-९-१९८५ पर्यंत संपलेल्या वर्षात ६५ लाख ६८ हजार रुपयाचा फायदा झाला आहे."[१२] डिस्टलरीतून बाहेर पडणारे घाण पाणी हा एक डोकेदुखीचा विषय ठरु शकतो. त्यातून प्रदूषण वाढू शकते. पण ते टाळण्यासाठी या पाण्याची विल्हेवाट लावण्यास कारखान्याची वेळापूर शिवारातील १२४ एकर जमिन खरेदी केली आहे. त्याठिकाणी स्पेंटवॉशवर प्रक्रिया केली जाते. नंतर त्या पाण्याचा वापर शेतीसाठी केला जातो. याठिकाणी फळबाग, ऊस आदी पिके घेण्यात येतात.

**विजय सहकारी कुक्कुटपालन संघ**

"विझोरी येथे विजयनगरमध्ये कुक्कुटपालनाचा उपक्रम सहकारी तत्त्वावर राबविला जात आहे. सुमारे दीड हजार सदस्य असलेल्या आणि सुमारे ६० हजार पक्षी असलेल्या या कुक्कुटपालन संघाची वार्षिक उलाढाल सुमारे एक कोटी रुपये आहे. याठिकाणी रोज तीस हजार अंड्यांचे उत्पादन होते. राजहंस कुक्कुटपालन संघाचा वाढता व्याप लक्षात घेवून आणि या संघटनेपासून स्फूर्ति घेवून आणि शंकरनगर भागातील कामगार व शेतमजूर व नागरिक यांनी १४ जानेवारी १९८६ ला या संस्थेची स्थापना केली आहे. राजहंसप्रमाणेच या संस्थेचा व्याप वाढतोच आहे."[१३]

याच तत्त्वावर शिवकृपा कुक्कुटपालन उद्योजक सहकरी संघही या भागात कार्यरत आहे. पिंजरा पद्धतीच्या या पोल्ट्रीचे ३२५ सभासद असून त्यांच्याकडे सुमारे १ लाख ६१ हजार अंड्यावरील पक्षी आहेत. या संस्थेलाही कारखाना मार्गदर्शन करीत आहे.

**शिवस्मृती फलोत्पादक सहकारी संस्था**

माळशिरस तालुक्यातील फलोत्पादक शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारच्या फळांची रोपे मिळवून देणे त्यांच्या फळबागातील फळे व भाजीपाला माल बाजारात पोहोच करणे, रोगनिवारक औषधे व खते इत्यादीबाबत मार्गदर्शन करणे इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यासाठी सर्व फलोत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन ११-१-१९८६ रोजी सहकारी कायदयाखाली संघाची स्थापना करण्यात आली आहे.[१३] संघाची सभासद संख्या ७६ असून लवकरच संघामार्फत फलोत्पादनाची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

**शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ**

शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी सहकारी खरेदी विक्री संघ प्रथमपासून झटत आहे. संस्थेची स्थापना २७-४-१९५६ ला झाली. तसेच शेतीमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्याचे कामही हा संघ करतो. खते, बियाणे, औषधे, अवजारे यांचा पुरवठा करुन शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास घडविण्याचे ध्येय संघाने नजरेसमोर ठेवले आहे. अकलूज येथे मुख्य कार्यालय तर नातेपुते येथे एक शाखा संघाने सुरु केली आहे. त्याशिवाय दोन्ही ठिकाणी अडत विभाग सुरु आहे.

राष्ट्रीय सहकारी विकास निगमने (नवी दिल्ली) या तालुक्यातील १८ प्राथमिक सोसायट्यांना ग्राहक भांडारासाठी भाग भांडवल दिले आहे.

**शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँक लि.**

"कोणत्याही योजना पार पाडावयाच्या असतील तर त्यासाठी पैसा हवाच. आर्थिक उपलब्धतेशिवाय कोणतीही योजना मार्गी लागू शकत नाही. शेतकरी तसेच शेतमजूर कामगार आणि सुतार, लोहार आदी कुशल वर्गाची आर्थिक गरज भागविण्यासाठी साखर कारखान्याच्या पुढाकाराने शंकरराव मोहिते-पाटील सहकारी बँकेची स्थापना करण्यात आली आहे."[१४] व्यवसायवाढीसाठी ही बँक कर्जपुरवठा करतेच पण दैनंदिन जीवनोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठीही कर्जे दिली जातात. घरबांधणी कर्ज, यंत्रसामुग्रीची खरेदी, कॅश क्रेडिट, वेअर हाऊस कर्ज, सोने तारण कर्ज आदी योजना या बँकेत आहेत. बँकेने एकूण कर्जाच्या ८९ ते ९० टक्के कर्जपुरवठा मागासवर्गीय सभासदांना केला आहे. संस्थेच्या

कर्जपुरवठ्याचे प्रमाण दीड लाखावर गेले असून वसुलीचे प्रमाणही विशिष्ट नियंत्रण रेषेखालीच आहे.

अशी ही संस्था अशा हिच्या प्रगतीच्या पाऊलखुणा. या खुणा म्हणजे सहकाराचे एक शिल्प आहे. तो एक चिरंतन इतिहास आहे. आणि तो घडविणारे सहकारमहर्षि आज हयात नाहीत. सहकाराच्या यशाचे सूत्र आपल्या कर्तबगार तरुण व अभ्यासू चिरंजीवांकडे सोपवून ते दूरच्या प्रवासाला गेले आहेत.

**सायलेंट स्पिरीट (ई. एन. ए.)**

विस्तारवाढ योजना पूर्ण झाल्यामुळे डिस्टीलरीमध्ये दररोज ६० हजार लिटर अल्कोहोलची निर्मिती होणार आहे. या अल्कोहोलपासून भारतीय बनावटीचे विदेशी मद्य बनविण्यासाठी लागणाऱ्या सायलेंट स्पिरीट निर्मितीच्या प्रकल्पाची उभारणी केली आहे.[१५] हा प्रकल्प दररोज २०,००० लिटर क्षमतेचा आहे.

**ॲसिटिक ॲसिड प्रकल्प**

डिस्टीलरीतून उत्पादीत होणाऱ्या अल्कोहोलचे वितरण वेळेत होणे ही संभाव्य बाब आहे. वारंवार साठवून ठेवण्याचा प्रश्न भेडसावत असल्याने डिस्टीलरीतील उत्पादन बंद ठेवावे लागत आहे. त्यास पर्यायी योजना म्हणून तसेच उत्पादीत अल्कोहोलचा दर मिळविण्याच्यादृष्टीने व आर्थिक उत्पादनात वाढ व्हावी यादृष्टीने ॲसिड उत्पादन प्रकल्प उभा करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची वार्षिक उलाढाल सहा हजार मेट्रीक टन इतकी असून त्यासाठी सुमारे ७५ लाख लिटर अल्कोहोल लागणार आहे. ॲसिटिक ॲसिड या आम्ल रसायनापासून मुख्यत: अंशत: व इतर रसायने तयार होतात. ॲसिटिक ॲसिडला सर्वत्र मागणी आहे. अकलूज बाजारपेठ राज्यात सर्वत्र प्रसिद्ध आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीने गावाजवळ २५ एकर जागा घेवून तेथे अद्यावत पद्धतीने मार्केट यार्ड बांधले आहे. नातेपुते येथे १४ एकर जागेत मार्केट यार्ड उभारण्यात आले आहे.[१६] तालुक्यातील श्रमजिवी शेतकऱ्यांच्या कापूस, शेंग, गुळ, खपली, एरंडी, हरभरा, तूर, ज्वारी इ. मालाचे तसेच शेळ्यामेंढ्या, लोकर आदीचे नियमन केले जाते. शासनाच्या बाजारभाव पद्धती योजनेत या बाजारपेठेचा समावेश असून १९५० साली स्थापन झालेल्या या समितीतर्फे रोज

बाजारभाव प्रसिद्ध केले जातात. या ठिकाणची वार्षिक उलाढाल सध्या सुमारे १२ कोटी रुपयांपर्यंत जावून पोहोचली आहे.[१७] या बाजारपेठेचा समावेश सुपरक्लासमध्ये आहे. वरील संस्थांनी कारखान्याच्या स्थापनेस मोलाची मदत केली आहे हे विसरता येणार नाही.

**मिथेल गॅस प्रकल्प**

१९८४ पासून चालू असलेल्या जुन्या डिस्टीलरीमधून प्रतिदिन ५ लाख लिटर स्पेंटवॉश बाहेर पडत असल्याने पर्यावरणाच्यादृष्टीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सक्तीनुसार स्पेंटवॉशची विल्हेवाट लावण्यासाठी 'मिथेल गॅस प्रकल्प' उभारण्यात आला आहे.

**शंकरराव मोहिते-पाटील यांचा औद्योगिक दृष्टीकोन**

"महाराष्ट्राच्या नकाशावर आज अकलूजचे स्थान महत्त्वाचे आहे. त्याचे कारण म्हणजे अकलूज पंचक्रोशीतील कै. शंकररावजींनी विणलेले सहकारी संस्थांचे जाळे, विविध प्रकारचे विविध शेतीपूरक उद्योग, कुक्कुटपालन संस्था, ग्राहक भांडारे अशा अनेकविध सहकारी संस्था त्यांनी उभ्या केल्या व यशस्वी करुन दाखविल्या सहकारातून प्रगती हा त्यांचा मूळ मंत्र होता. सामान्य शेतकरी हा आर्थिकदृष्ट्या समर्थ बनला पाहिजे हे त्यांचे ध्येय होते."[१९] मात्र तालुक्यातील ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची कायमची अडचण त्यांनी त्या शेतकऱ्यांना साखर कारखान्याचे सभासद करुन घेवून दूर केली. २५-३० मैलावरील माण तालुक्यातील ऊस पिकविणारे शेतकरी त्यांनी आपले मानले व त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी परिश्रम घेतले. विहीर बागायतीसुद्धा त्यांनी किफायतशीर बनवून टाकले."[२०]

सहकाराशिवाय समाजाला पर्याय नाही व समाजाचा विकासही नाही हे लक्षात घेताच त्यांनी अनेक गोष्टी या पल्याने पार पाडल्या. सहकार म्हटले की अनेकांशी संबंध अनेकांचा विरोध हे क्रमप्राप्त आहे. विरोध हे चुका दुरुस्तीची संधी व जोमाने कार्य करण्याची वेळ असे गणित त्यांनी मांडले व विरोधकांनाही आपल्या यशस्वी कार्याचे मूल्यमापन करण्याची पुन्हा एकबार पाळी आणली. कार्यकर्त्यांनी सिहांच्या गतीने झेपा घेतल्या. यशामागून यश मिळविणे. खडकाळ माळरानाचा संपूर्ण कायापालट केला व सहकारी संस्थांच्या माध्यमातून माळरानाचे नंदनवन केले. ईश्वरावर पराकोटीची श्रद्धा

व सहकाऱ्यांचा प्रचंड विश्वास या दोन गोष्टींच्या जोरावर अनेक अवघड कामे त्यांनी सहजासहजी पूर्ण केली. अकलूजसारख्या छोट्या गावाचे अग्र शहरात रुपांतर झाले आहे. यामागे संपूर्ण प्रेरणा ही शंकरराव मोहिते-पाटील यांचीच होती. "एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ।।" ही संत तुकाराम महाराजांची उक्ती म्हणजे एकूण सुखी मानवी जीवनाला आणि त्यांचा एक भाग असणाऱ्या सहकारी चळवळीला सदैव शिरसंवाद्य वाटायला हवे असे कै. शंकररावजींना वाटे.[२१] हीच सहकाराची भावना सर्वांच्या मनात रहायला हवी. वैयक्तिक स्वार्थाला स्पर्शही इथे होऊन उपयोगी नाही. नेहमी ध्यास पाहिजे. तो सर्वोत्तमाचा, संस्कारयुकत सहकारी एकतेचा. यातूनच भारत देशात ग्रामीण भागात राहणाऱ्या ८५ टक्के लोकांची गरीबी आणि अज्ञान दूर करता येईल.[२२] ग्रामराज्याचे स्वप्न साकार होईल. सुसंस्कारित सहकारी जीवन पद्धतीच आम्ही स्वीकारावी. तोच आपल्या भारतवर्षाचा प्राचीनतम वारसा आहे. देशाच्या विकासाचे काम प्रामाणिकपणे करण्यास सामान्य कार्यकर्ता हा असामान्य तर असतोच पण खरे म्हणजे तोच देशाचे बलस्थान असतो. यादृष्टीने शंकररावजींनी सहकाराची भावना अकलूज परिसरातील कार्यकर्त्यांत रुजवली.

**समारोप**

'सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील ग्रामीण नेतृत्त्वाचा एक अभ्यास' या प्रबंधातील या प्रकरणामध्ये त्यांनी सहकार व औद्योगिक क्षेत्रात कशाप्रकारचे कार्य केलेले आहे याची सविसतर माहिती दिसून येईल. ग्रामीण भागामध्ये किंवा देशाच्या सहकार क्षेत्रामध्ये सर्वात पहिली सहकारी संस्था म्हणजे विविध कार्यकारी सेवा सोसायटी होय. या संस्थेमध्ये कोणाही व्यक्तीला काम करण्याची संधी मिळू शकते. सहकारमहर्षिनाही सर्वप्रथम विविध कार्यकारी सेवा सोसायटीमध्ये सर्वप्रथम काम करण्याची संधी मिळाली व सहकाराचे बाळकडू त्यांना तिथेच मिळालेले दिसून येते. सहकारमहर्षि सहकारी संस्थेमध्ये सर्व जातीजमातींच्या व्यक्तींना समान संधी देत असत. त्यामुळे बऱ्याच सहकारी संस्थेमध्ये निवडी या शक्यतो बिनविरोधच होत असत. त्यांनी सहकार चळवळीमध्ये साखर कारखान्यांना अतिशय महत्त्व दिलेले दिसून येते. पहिला कारखाना १९४९ साली सुरु झाला. या कारखान्याचा अनुभव लक्षात घेवून १९६० साली महाराष्ट्रात

१३ सहकारी साखर कारखाने झाले. आज १२७ साखर कारखाने महाराष्ट्रात आहेत आणि त्यात वरवेचर भर पडत आहे. साखर कारखान्याच्या कामाचा प्रचंड विस्तार झालेला आहे. एकूण देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासामध्ये त्या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. साखर उत्पादनाबरोबरच अनेक रासायनिक प्रकल्प उभारले आहेत.

गाळप हंगामात दर कारखान्यामागे सुमारे ५००० लोकांना रोजगार मिळतो. अंदाजे रु. १०० कोटी या उद्योगात गुंतले जातात आणि प्रतिवर्षी सुमारे रु. ३००० कोटींची उलाढाल होते. सहकारी साखर कारखाना ही उत्पादकांची सहकारी संस्था आहे. उत्पादकांना आपल्या मालाची योग्य किंमत मिळवून देणे, त्यासाठी त्यावर प्रक्रिया करणे हे सहकारी संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असते.

आज महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, बहुतेक सर्व राजकीय नेत्यांच्या ताब्यात सहकारी संस्था आहेत. त्यामध्ये साखर कारखाने, बँक, पतसंस्था, सूतगिरण्या, दूध संघ, ग्राहक भांडार इत्यादींचा समावेश होतो. या संस्थांच्या आर्थिक पाठींब्यावर राजकारणात भाग घेतला जातो व त्यात ते यशस्वी होतात. दक्षिण महाराष्ट्रात तर प्रत्येक तालुक्यात एक सहकारी साखर कारखाना असे चित्र दिसते. या राजकीय सत्तेच्या जोरावर आणखी काही सहकारी संस्थांचा जन्म होतो. त्यामुळे अशा राजकीय नेत्याची राजकीय पकड अधिक मजबूत होते. म्हणजे त्यांना राजकारणात यशस्वी होण्यासाठी सहकारी संस्था ताब्यात असणे आवश्यक वाटते. सहकारमहर्षिनींही सहकारी संस्था जवळजवळ ज्या आवश्यक वाटतात त्या स्थापन केलेल्या दिसून येतात. त्यामुळे अर्थातच लोकांना काम मिळाले व आपोआपच भागाचा विकास होण्यास चालना मिळाली. यामुळे राजकीय सत्ताही शाबूत राहण्यास मदत झाली. आजतागायत या सहकारी संस्थेच्या स्थापनेमुळे माळशिरस तालुक्यातील सर्व राजकीय सत्ता त्यांच्या संबंधितांच्या ताब्यात आहेत. एवढेच नव्हे तर त्यांनी तालुक्यापुरते मर्यादित सहकारी संस्थांचा विकास केलेला नाही तर संपूर्ण सोलापूर जिल्हयात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केलेले आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्हयावरती त्यांचे वजन असलेले दिसून येते.

आज सोलापूर जिल्हा म्हटले की, महाराष्ट्रात कोणीही सहकारमहर्षिंचेच नाव सर्वप्रथम घेत असतात. त्यांनी तळागाळातील व्यक्तींना सामावून घेऊन सहकारक्षेत्रात काम केलेले दिसून येते. त्यांना सहकारक्षेत्रात वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, शरद पवार यांचेही सहकार्य लाभलेले दिसून येते. माळशिरस तालुक्यात कसल्याही प्रकारची सोय नाही असे बोट दाखविता येत नाही. सहकार चळवळीचा वसा सहकारमहर्षिंच्यानंतर त्यांचे चिरंजीव विजयसिंह व प्रतापसिंह यांनी अगदी योग्य रितीने चालवेलेला दिसून येतो. त्यांनासुद्धा सहकाराबद्दल चांगला अनुभव आहे. सहकारामुळे माणसे जोडता येतात हे त्यांना मनोमन माहिती झालेले आहे. सहकारमहर्षिना म्हणूनच जगद्गुरु शंकराचार्यांनी सर्व जिल्हयातील जनतेसमोर सहकारातील भरीव कामगिरीबद्दल "सहकारमहर्षि" ही पदवी बहाल केली आहे.



SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

**संदर्भ**


१. दिनकरराव माने, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, १९६२ ते १९८७, पृ. ३७, ३८
२. उपरोक्त, पृ. ४१
३. राजसिंह मोहिते-पाटील, गोडवा (मासिक), फेब्रुवारी, १९९३, पृ. २३
४. दिनकरराव माने, लोकराज्य, दि. १६ फेब्रुवारी १९९३, पृ. ३४
५. ॲड. केसूर वकील, लोकराज्य, दि. १६ फेब्रुवारी १९९३, नृ. ४२
६. राजहंस सहकारी कुक्कुटपालन संघ लि., अकलूज, २९ वा वार्षिक अहवाल, १९९३-९४, पृ. ३
७. धर्मराज पताळे - मुलाखत, दि. १२-८/२००५
८. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील - ११ फेब्रुवारी, १९९४, पृ. २६
९. तरुण भारत, पुणे, दि. २१-१-१९९६
१०. दिनकरराव माने, सहकारी महाराष्ट्र, जानेवारी १९९३, पृ ३७
११. रामचंद्र माने गुरुजी, मुलाखत दि.
१२. गामविकास कार्य (टिप्पणी), सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील, दि. १४-१-१९९३, पृ. २, ३,४
१३. रामचंद्र माने गुरुजी मुलाखत दि.
१४. रोमण पाटील मुलाखत दि. १७-९-२००५
१५. शिवदास आबा कुंभार, झंकार, पृ. २७
१६. दामू आण्णा पाटील मुलाखत, दि २३-४-२००५
१७. श्री. अनंत मिरासदार, झंकार, पृ. १८३
१८. वि. ना. शिंदे मुलाखत, दि. २५-७-२००५
१९. दिनकरराव माने, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, १९६२ ते १९८७, पृ. ४२, ४३, ४५, ४८
२०. रघुनाथ माने गुरुजी मुलाखा
२१. वसंतराव संभाजी पाटील, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, १९६२ ते १९८७, पृ. ४२, ४३, ४५, ४८
२२. बापू जैन मुलाखत, दि. २७-१०-२००५.